## निशाण क्र. २४६ वरील आदेश

मयत वादी क्रमांक ७ चे वारसांतर्फे त्यांना मयत वादी क्रमांक ७ चे वारस म्हणून याकामी समाविष्ट होण्यासाठी व त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करणे साठी परवानगी मिळण्यासाठी हा अर्ज दाखल केला आहे. अर्ज व म्हणणे वाचले. अर्जदार व प्रतिवादींतर्फे विद्वान विधज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

२. एकत्र कुटुंबाच्या मिळकतींचे वाटप होणेस्तव प्रस्तुतचा दावा दाखल करण्यात आलेला आहे. मयत वादी क्रमांक ७ या वादी, प्रतिवादी कुटुंबातील सदस्य होत्या याबाबत वाद नाही. अशा प्रकरणी वादी क्रमांक ७ मयत झाल्यानंतर हा दावा चालवण्याचा अधिकार त्यांच्या वारसांना आहे असे मला वाटते. वादी क्रमांक ७ या दिनांक २०/१०/२०२० रोजी मयत झाल्या आहेत व हा अर्ज दिनांक १९/३/२०२१ रोजी दाखल करण्यात आला आहे असे दिसून येते. मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सु मोटू रिट पिटीशन (दिवाणी) क्रमांक ३/२०२० दिनांक ०८ मार्च २०२१ च्या आदेशान्वये दिनांक १५/०३/२०२० ते १४/०३/२०२१ हा कालावधी, कोणताही दावा, अर्ज, अपील किंवा प्रकरण दाखल करण्यास आवश्यक असणा–या विहित मुदतीमधून वगळण्यात यावा असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज हा मुदत बाहय आहे असे म्हणता येणार नाही. सबब वरील कारणास्तव हा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश

पारित करीत आहे :

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. पुढील तारखेपर्यंत मयत वादी क्रमांक ७ चे वारसांना दाव्यामध्ये समाविष्ट होणेस व त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करणेस परवानगी देण्यात येते.

३. पुढील तारखेपर्यंत मयत वादी क्रमांक ७ च्या वारसांनी दाव्यामध्ये दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत द्यावी.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : कोरेगाव ( गि. सु. माने )
दिनांक १४/०९/२०२१ दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.